पुढारी

# 'एसएनडीटी'च्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. जगन कराडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांची मुंबई येथील 'एसएनडीटी' महिला विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार ही नियुक्ती करण्यात येत असल्याचे पत्र विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. वंदना शर्मा यांनी नुकतेच त्यांना पाठविले आहे. समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदावरील नियुक्तीमुळे ते मानव्यशास्त्र विद्याशाखेसह समाजशास्त्र विषय समिती, संशोधन व निवड समिती आणि विद्या परिषद या समित्या व अधिकार मंडळाचे पदसिद्ध सदस्य बनले आहेत. देशातील समाजशास्त्रज्ञांची शिखर संस्था असलेल्या भारतीय समाजशास्त्र संस्थेचे ते सचिव आहेत.

पुढारी

# एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांना मिळाले १० लाखांचे पॅकेज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील एम.बी.ए. युनिट व सेंट्रल प्लेसमेंट विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॅम्पस प्लेसमेंटमध्ये काही विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांचे कंपन्यांचे पॅकेज मिळाले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण एस. महाजन यांच्या उपस्थितीत झाला. डॉ. अनुप मुळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रामदास बोलके यांनी आभार मानले. यावेळी सेंट्रल प्लेसमेंट विभागप्रमुख डॉ. गजानन राशिनकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. गंधाली खारगे, प्रमोद सामुद्रे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात मंगळवारी आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन अध्ययन विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २१) सकाळी ७.२० ते ८.२० या वेळेत विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृह येथे आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त सामूहिक योग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# समाजशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्षपदी डॉ. कराडे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांची मुंबई येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ नुसार ही नियुक्ती करण्यात येत असल्याचे विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. वंदना शर्मा यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रात म्हटले आहे.



या नियुक्तीमुळे ते आता तेथील मानव्यशास्त्र विद्याशाखेसह समाजशास्त्र विषय समिती, संशोधन व निवड समिती आणि विद्या परिषद या समित्या व अधिकार मंडळाचे पदसिद्ध सदस्य बनले आहेत.

19 JUN 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑलिम्पिकपटू मुल्लाणी हिचा सत्कार

**कोल्हापूर, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठाची जलतरणपटू सुबिया मुल्लाणीने ब्राझील येथे झालेल्या डिफ ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. यासाठी कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सुबियाचा ५० हजार रुपयांचा मदतनिधी देऊन सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागात सुबियासह कोटा येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त करून तमिळनाडूतील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला फुटबॉल संघातील क्रीडापटूंचा सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, की विद्यापीठाचा लौकिक आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत उंचावणाऱ्या सुबियाला यापुढील काळातही मदत करण्याचे धोरण विद्यापीठाचे असेल. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे सर्वच क्रीडापटू सातत्याने सरावात कसे राहतील. त्यांची कार्यक्षमता कशी वाढेल, या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात येत आहेत. खेळाडूंनीही त्यांचा आहार, प्रवास, स्थानिक तसेच स्पर्धा स्थळावरील सुविधांविषयी त्यांचे अनुभव विद्यापीठाला खुलेपणाने कळवावेत, जेणेकरून त्यावर योग्य कार्यवाही करता येईल. त्यानंतर या संदर्भातील धोरण सुनिश्चित करणे शक्य होईल. क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले.' प्रशिक्षक प्रकाश कावले यांनी आभार मानले.

विशेष प्रशिक्षक मृणाल खोत, व्यवस्थापक नीळकंठ कांबळे, फुलबॉल संघातील अर्पिता पवार, सोनाली सुतार, निशा पाटील, सानिका चौगुले, जुलेखा बिजली, सोनाली साळवी, तेजस्विनी पाटील, यशश्री देशमुख, प्रियांका मोरे, ज्योती ढेरे, प्रेरणा गराडे, पूनम मिठारी, प्रतीक्षा मिठारी, प्रणाली चव्हाण, भाग्यश्री कदम, शासिया पठाण आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : ब्राझीलमध्ये झालेल्या डिफ ऑलिम्पिकमध्ये जलतरण स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी सुबिया मुल्लाणी हिला स्मृतिचिन्ह व मदतनिधी प्रदान करण्यात आला. कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.**

जनसंपर्क कक्ष
19 JUN 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : 'सकाळ माध्यम समूहा'तर्फे शनिवारी 'गौरव भूमिपुत्रांचा' या पुरस्कारांचे वितरण झाले. या वेळी ज्येष्ठ विधिज्ञ अभय नेवगी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार, निवासी संपादक निखिल पंडितराव, उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर यांच्यासह गौरवमूर्ती. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# 'जगात भारी कोल्हापूर' सर्वदूर पोचवूया

## ॲड. अभय नेवगी; 'गौरव भूमिपुत्रांचा' ॲवॉर्डचा दिमाखदार वितरण सोहळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कोल्हापूर जगात भारी असल्याचे आपण अभिमानाने सांगतो. कोल्हापूरकरांनी अनेक नव्या संकल्पना केवळ मांडल्याच नाहीत, तर त्या यशस्वीही केल्या. आजही सर्वच क्षेत्रांत कोल्हापूर आघाडीवर आहे. पण, या प्रवासात ज्यांनी-ज्यांनी मोलाचे योगदान दिले, त्यांच्या स्मृती विविध माध्यमातून जपायला हव्यात. कारण त्यांच्या याच यशकथा नव्या पिढीलाही प्रेरणा देणाऱ्या ठरणार असल्याचे मत आज ज्येष्ठ विधिज्ञ अभय नेवगी यांनी व्यक्त केले. 'सकाळ माध्यम समूहा'तर्फे आयोजित गौरव भूमिपुत्रांचा 'सन्स ऑफ सॉइल'' पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. हॉटेल सयाजीत झालेल्या या दिमाखदार सोहळ्यात विविध क्षेत्रांतील यशस्वी भूमिपुत्रांचा गौरव झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के या वेळी प्रमुख उपस्थित होते.

ॲड. नेवगी यांनी कोल्हापुरी टॅलेंटचा प्रवास मांडताना गेल्या काही वर्षांतील विविध संकल्पनांचा वेध घेतला. ते म्हणाले, ''सत्तरच्या दशकात कोल्हापुरात वॉशिंग मशिनचा प्रयोग यशस्वी झाला. १९८२ च्या सुमारास 'मीरा' नावाची कार, तर घाटगे-पाटील कंपनीत लक्ष्मी मोपेड तयार झाली होती.

IDOLS महाराष्ट्र 2022
SON'S OF SOIL

म्हादबा मेस्त्रींनी फक्त फिरता रंगमंचच नव्हे, तर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बसमध्ये विविध प्रयोग यशस्वी केले. डिझेल इंजिनपासून ते फौंड्रीपर्यंत आणि फिल्म इंडस्ट्रीतील प्रत्येक गोष्टीत कोल्हापुरी टॅलेंट झळकले. किंबहुना, सर्वांत पहिल्यांदा अनेक नव्या गोष्टी कोल्हापुरातच निर्माण झाल्या. या साऱ्या गोष्टींची माहिती एकाच ठिकाणी भावी पिढीसाठी उपलब्ध असायला हवी.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, की 'सकाळ माध्यम समूह' केवळ बातम्या देणारा समूह नसून, त्याच्याही पलीकडे जाऊन समाजातील सर्व घटकांसाठी विविध उपक्रम राबविणारा समूह आहे. समाजातील चांगल्या गोष्टींना बळ देण्यासाठी समूहाने सुरू केलेला पुरस्कारांचा हा उपक्रम स्तुत्य असून, तो नव्या पिढीसाठी आदर्शवत आहे. सध्या सोशल मीडियावर विविध यशकथा मांडणारे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. 'सकाळ'ने या माध्यमातूनही अशा भूमिपुत्रांच्या यशकथा सर्वांसमोर आणायला हव्यात.

'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार यांनी उपक्रमाचा उद्देश सांगितला. ते म्हणाले, ''मुळात आपलं गाव सोडून बाहेर जाण्याचं धाडस फारसं कुणी करीत नाही. मात्र, विशिष्ट ध्येय उराशी घेऊन अशी अनेक माणसं बाहेर पडली आणि त्यांनी आपापल्या क्षेत्रात यशोशिखर गाठले. अशाच भूमिपुत्रांचा सन्मान करताना त्यांच्याकडून भावी पिढीला प्रेरणा मिळावी, हाच मुख्य उद्देश आहे.''

'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी आभार मानले. उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर व्यासपीठावर उपस्थित होते. शुभम साळोखे व रोहित सुतार यांच्या बँडने स्वागत केले. भूषण करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले.

### विद्यापीठाचा असाही पुढाकार

ॲड. नेवगी यांनी, विधी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रम सुरू करावेत. त्यासाठी नेवगी असोसिएट्सतर्फे सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली. त्याशिवाय, 'जगात भारी कोल्हापूर'च्या डॉक्युमेंटेशनसाठीही विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याचा परामर्श घेत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही दिली.

### या भूमिपुत्रांचा झाला गौरव

कोल्हापूर विभागातून अशकीन आजरेकर, दयानंद भोईटे, सचिन बारवाडे, अमरदीप चौगुले, शीतलकुमार डोईजड, ओंकार घाटे, शैलेश गद्रे, रणजितसिंह घाटगे, नीलेश नार्वेकर, गणेश नायकुडे, ओंकार नवलिहाळकर, एकनाथ पाटील, डॉ. बी. डी. पाटील, संजय पाटील, डॉ. विजय पाटील, राज राजशेखर, गणपती पाटील, विश्वजित सावंत, सुकुमार साळुंखे, डॉ. विद्या ठकार, परशराम तावरे, अभय कोटकर-पाटील या भूमिपुत्रांचा दिमाखदार सोहळ्यात गौरव झाला.

जनसंपर्क कक्ष

19 JUN 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सावर्डे बुद्रुकचा धनाजी दक्षिण कोरियात संशोधक

## आंतरराष्ट्रीय नियतकालिकात १४ शोधनिबंध, ४ पेटंट प्रसिद्ध : सौरऊर्जेचा वापर करुन पाण्यापासून हायड्रोजन निर्मिती

आप्पासाहेब रेपे
सावर्डे बुद्रुक

तुटपुंजी कोरडवाहू व डोंगराळ शेतीतून केवळ लहरी पावसाच्या पाण्यावर येणाऱ्या पिकावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालायचा. वडिलांचे लहानपणीच छत्र हरपले होते. तरीही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर प्लंबिंग काम करत सावर्डे बुद्रुक (ता. कागल) येथील धनाजी मालवेकर या तरुणाने उच्च शिक्षण घेतले आणि दक्षिण कोरिया येथील चोन्नम



डॉ. धनाजी मालवेकर

### ▪ प्लंबिंग काम करत घेतले उच्च शिक्षण

नॅशनल विद्यापीठात त्याची संशोधक म्हणून निवड झाली आहे. येथील डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या डॉ. धनाजी यांची कहाणी प्रेरणादायी आहे.

अशिक्षित आईवडील, गावात घर बांधायलाही जागा नाही. म्हणून सावर्डे बुद्रुकच्या उत्तरेला डोंगराच्या पायथ्याशी शेतातच झोपडीवजा घर बांधले. धनाजी पहिलीत असतानाच त्याच्या वडिलांचे कॅन्सरने निधन झाले. परिस्थिती आणखी बिकट झाली. धनाजी मामाच्या गावी चौंडाळ येथे शिक्षणासाठी गेला. आई रोजगार करून कुटुंबाचा गाडा हाकू लागली. धनाजीने प्राथमिक शिक्षण विद्या मंदिर चौंडाळ आणि माध्यमिक शिक्षण महालक्ष्मी हायस्कूल सावर्डे बुद्रुक येथे पूर्ण केले. दूधसाखर महाविद्यालय बिद्री येथे पदवीचे शिक्षण घेत असताना प्लंबिंग काम करुन त्याने शिवाजी विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

पान ४ पहा



आई आनंदी यांच्यासमवेत धनाजी

### संशोधक विद्यार्थ्यांसाठी जागतिक व्यासपीठ

या निवडीबाबत बोलताना डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे म्हणाले, अत्याधुनिक संशोधनास चालना देण्याचे, संशोधक विद्यार्थ्यांसाठी जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मानस विद्यापीठाने ठेवला आहे.

## सावर्डे बुद्रुकचा धनाजी दक्षिण कोरियात संशोधक

पान १ वरून

त्यानंतर कोल्हापुरात खासगी क्लासेस सुरु केले आणि त्यातून मिळणाऱ्या पैशातून डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, अभिमत विद्यापीठामध्ये धनाजीने पीएच. डी. केली. हे करताना त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये १४ शोधनिबंध, ४ पेटंट प्रसिद्ध केले.

डॉ. मालवेकर यांनी डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठामधून पदार्थविज्ञान या विषयामध्ये रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. प्राप्त केली आहे. या फेलोशिपमुळे डॉ. मालवेकर यांना सौरऊर्जेचा वापर करून पाण्यापासून हायड्रोजन निर्मिती या क्षेत्रात सखोल संशोधन करण्याची संधी मिळाली आहे. हायड्रोजन वायूचा चारचाकी गाड्यांचे इंधन म्हणून वापर करता येतो. त्यामुळे कोणतेही प्रदूषण होत नाही. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इंधनाच्या किमतीत वाढ आणि जगातील प्रदूषणाची परिस्थिती पाहता जगातील अनेक नामांकित संशोधन संस्था ग्रीन हायड्रोजन तयार करण्यामध्ये सहभाग घेत आहेत. यामुळे अनेक संशोधकांना यामध्ये संशोधन करण्याची संधी उपलब्ध होत आहे. यामध्ये डॉ. मालवेकर यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JUN 2022


तरुण भारत

# नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना मिळाल्या नोकऱ्या

## शिवाजी विद्यापीठातील एमबीए युनिट विभागाचे मोठे यश : ३ पासून १० लाख रुपयांपर्यंतच्या पॅकेजची कंपन्यांकडून घोषणा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील एमबीए युनिट ॲण्ड सेंट्रल प्लेसमेंट विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॅम्पस प्लेसमेंटमध्ये एमबीए युनिटमधील विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादित केले. या सर्व विद्यार्थ्यांना स्टेट स्ट्रीट एचसीएल, बायजुजू, एचडीबी फायनांशियल सर्व्हिसेस, एसीसी लिमिटेड, एन. जे. ग्रुप, होम फर्स्ट आदी नामांकित कंपन्यांनी नोकऱ्यांसाठी पात्रही ठरवले आहे. शिवाय त्यांना ३ पासून १० लाख रुपयापर्यंतचे सरासरी वार्षिक पॅकेजही दिले जाईल, असे कंपन्यांनी जाहीर केले आहे.



कोल्हापूर : कॅम्पस प्लेसमेंटमधून विविध कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळवलेल्या विद्यार्थ्यांसोबत डॉ. श्रीकृष्ण एस. महाजन, डॉ. अनुप मुळे, डॉ. दीपा इंगवले व डॉ. गंधाली खारगे आदी.

दरम्यान, कॅम्पस प्लेसमेंटमध्ये नोकरी मिळवण्यासाठी दाखवलेल्या बुद्धीचातुर्याबद्दल एमबीए युनिट ॲण्ड सेंट्रल प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांचा सत्कार करुन त्यांना शब्बासकी दिली. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रा. श्रीकृष्ण एस. महाजन यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी सत्कार स्वीकारला. यावेळी डॉ. महाजन यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून भावी आयुष्यात यशस्वी उद्योजक बनायचे असेल तर शॉर्टकटचा मार्ग अजिबात अवलंबू नका, असे सांगितले. डॉ. अनुप मुळे यांनी प्रास्ताविक करताना एमबीए युनिट ॲण्ड सेंट्रल प्लेसमेंट विभागाच्या वाटचालीची माहिती सांगितली. यावेळी डॉ. दीपा इंगवले व डॉ. गंधाली खारगे उपस्थित होत्या. कॅम्पस प्लेसमेंट यशस्वी करण्यासाठी डॉ. गजानन राशिनकर, प्रमोद समुद्रे यांच्यासह विद्यापीठाचे प्रशिक्षण व रोजगार अधिकारी यांनी परीश्रम घेतले. डॉ. रामदास बोलके यांनी आभार मानले.